# मोडिलिपी प्रशिक्षण वर्गाचे उद्या उद्‌घाटन

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासन पुराभिलेख संचालनालयाच्या वतीने सोमवार (दि. २५) दुपारी ३ वाजता शहाजी कॉलेजमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मोडिलिपी प्रशिक्षण वर्गाचे उद्‌घाटन होणार आहे. उद्‌घाटक म्हणून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित राहणार आहेत. तर शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन विजयराव बोंद्रे, इतिहास अभ्यासक डॉ. इंद्रजित सावंत, जिल्हा कोषागार अधिकारी महेशकुमार कारंडे उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त विद्यार्थी, प्राध्यापक व इतिहास अभ्यासकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पुराभिलेख संचालनालय सुजितकुमार उगले यांनी केले आहे.

# शिवाजी, पंजाब विद्यापीठ विजयी

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी–२० क्रिकेट स्पर्धेत शनिवारी झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने दिनदयाळ उपाध्ये विद्यापीठ गोरखपूरवर ६ गडी राखून तर पंजाब विद्यापीठ पटियालाने महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ अजमेर संघावर ७ गडी राखून विजय संपादन केला.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाने दिनदयाळ उपाध्ये विद्यापीठ गोरखपूर संघावर ६ गडी राखून मात केली. प्रथम फलंदाजी करताना गोरखपूर विद्यापीठाने २० षटकात ९ बाद १४९ धावा केल्या. यामध्ये मनिष श्रीवास्तवने ८६ धावांची अर्धशतकी खेळी केली. शिवाजी विद्यापीठाकडून गोलंदाजी करताना विश्वनाथ वरुटेने २७ धावात हॅट्रीकसह ५ बळी घेतले. वरुटे यांची स्पर्धेतील ही २ री हॅट्रीक ठरली. उत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ संघाने हे लक्ष १९.३ षटकात ४ बाद १५० धावा करून सहज पूर्ण केले.



शिवाजी विद्यापीठाचा गोलंदाज विश्वनाथ वरुटेने शनिवारी झालेल्या सामन्यात हॅट्रीकसह ५ बळी घेतले.

दुसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना अजमेर विद्यापीठाने २० षटकात सर्वबाद ५८ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना पंजाबी विद्यापीठाने हे लक्ष २० षटकात २ बाद ६० धावा करून पूर्ण केले. यामध्ये प्रितपाल सिंगने २७ तर पंकज प्राशरने १६ धावांची खेळी केली.